# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : २८०/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.मनिष सदानंद कोचरेकर,
¼ शाम अपार्टमेंट, स्टेशन रोड,
लालचक्की, उल्हासनगर ४
जि.ठाणे ४२१ ००४.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय मेढा, ता.वेंगुर्ला,
जि.सिंधुदुर्ग

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तथा
ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय मेढा, ता.वेंगुर्ला,
जि.सिंधुदुर्ग

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १८/८/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २०/१२/२०२१ | ---- | २/२/२०२२ | ४/३/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२१/३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १८/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान व तत्कालिन जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" दि.२७.१०.२०१६ रोजीचे पत्राच्या अनुषंगाने आपण मला कोणतीही माहिती पुरविली नाही. त्यामुळे दि.२७.१०.२०१६ ते २०२१ डिसेंबर सर्व अभिलेखांची साक्षांकित प्रत देण्यात यावी"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.४/३/२०२२ रोजी, *"श्रीम.रत्नप्रभा यशवंत टेमकर शासकिय जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत मेढा तालुका वेंगुर्ला यांनी सुनावणीत सांगितल्याप्रमाणे, अपिलकर्ता यांना सदरची माहिती विनामोबदला विनाविलंब ७ दिवसांचे आत साक्षांकित करून देण्यात यावी."* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी त्यांचे दि.१८/८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये लेखी म्हणणे सादर केले की, त्यामध्ये त्यांनी मागणी केली की, आयोगाने के.आर.४३४९/२०१५ मध्ये दि.२७/९/२०१६ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी आणि अपिलार्थी यांनी दि.१/१०/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता रस्त्याचे संयुक्तपणे निरीक्षण करावे व तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध माहिती १५ दिवसात अपिलार्थी यांना विनामुल्य द्यावी.

आयोगाच्या आदेशाच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी यांनी रस्त्याचे निरीक्षण केले व त्यासंदर्भात अहवाल सरपंच/ ग्रामसेवक, ग्रामपंचायत निवती यांना दि.२८/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये पाठविला. या अहवालाच्या आधारे ग्रामपंचायतीच्या नमुना क्र.२६ मध्ये सदर रस्त्याची नोंद घेणे आवश्यक आहे. अशा नोंद घेतलेल्या अभिलेखाची प्रत आपण मागितली आहे. ती अद्याप आपणास प्राप्त झाली नाही.

पोस्ट विभागाच्या संकेतस्थळावरून रिपोर्ट काढले असता जन माहिती अधिकारी यांना आजच्या सुनावणी सूचना प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. सबब त्यांचे म्हणणे जाणून घेण्याकरिता त्यांना पुन्हा सुनावणी सूचना काढणे उचित होईल.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयोग कार्यालयाने सदर प्रकरणी सुनावणी सूचना काढावी.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१/१०/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ ऑगस्ट, २०२५ .

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**